पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८,लेखा विभाग
क्र. लेखा/२९/कावि/३६२ /२०२२
दिनांक :२५/११/२०२२

**विषय :- सन २०२३-२०२४ चे अंदाजपत्रकात नागरिकांचा सहभाग.**

**परिपत्रक,**

सन २००७ -२००८ पासुन महापालिकेचे अंदाजपत्रक तयार करताना नागरिकांच्या सुचनेनुसार आवश्यक कामांचा अंतर्भाव अंदाजपत्रकात करणे, असा उपक्रम महापालिकेने राबविलेला असून त्यासाठी वर्तमानपत्रात प्रसिध्दी करुन नागरिकांना कामे सुचविणेबाबत जाहिर आवाहन करण्यात आलेले होते. त्याच धर्तीवर सन २०२३-२०२४ चे अंदाजपत्रक तयार करताना सदर उपक्रमास नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळावा व अंदाजपत्रक तयार करताना क्षेत्रिय कार्यालये, यांचे स्तरावर नागरिकांकडून त्यांच्या क्षेत्रिय कार्यालयात करावयाच्या कामांबाबत सुचनांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करणेसाठी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

१) लेखा विभागाकडून दैनिक वृत्तपत्रात जाहिर आवाहन प्रसिध्द करणेत येईल. त्याची प्रत व अर्जाचा नमुना प्रत्येक क्षेत्रिय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाच्या दर्शनी ठिकाणी लावून या उपक्रमाची माहिती नागरिकांना द्यावी.

२) मा.क्षेत्रिय समिती अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली क्षेत्रिय समितीची बैठक प्रस्तुत प्रयोजनाचे विचारार्थ बोलविण्यात यावी. त्या बैठकीमध्ये क्षेत्रिय समिती सदस्यांबरोबर नागरिकांच्या अंदाजपत्रक सहभागाबाबत चर्चा घडवून आणावी. नागरिकांच्या सहभागातून अंदाजपत्रक तयार करणेबाबतचा प्रारुप कार्य आराखडा तयार करण्यात यावा.

३) एका कामाची रक्कम र.रु. १० लाखापेक्षा जास्त नसावी.

४) नागरिकांकडून आलेले कामांचे प्रस्ताव याबाबत संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडून छाननी करुन घेऊन कामांचा प्राधान्य क्रम ठरविण्यात यावा व त्यांचा समावेश क्षेत्रिय समिती अंदाजपत्रकात करुन अंतिमत: मान्यतेसाठी पाठविण्यात यावेत. सोबत क्षेत्रिय कार्यालयांसाठी मार्गदर्शक सूचना ( Directions to zone office) माहिती पत्रक जोडले आहे.

५) सहभागी अंदाजपत्रक सन २०२३-२०२४ संदर्भातील नागरिक सूचना अर्ज भरण्या संदर्भातील माहिती, सर्व क्षेत्रिय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात नागरिकांना

सूचना अर्ज वाटपासाठी विनामुल्य उपलब्ध करावयाचे आहे व नागरिकांकडून प्राप्त झालेल्या अर्जाची पोहच देऊन जाहिर केलेल्या तारखेस किती कामांचा समावेश अंदाजपत्रकात केला आहे ते जाहिर करावे.

६) मा. क्षेत्रिय समितीच्या मान्यतेनंतर क्षेत्रिय अधिकारी यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व क्षेत्रिय कार्यालयांची एकत्रित माहिती महापालिका अंदाजपत्रकात समाविष्ट करणेसाठी मा. आयुक्त यांचेकडे सादर करावी.

७) सन २०२३-२०२४ चे अंदाजपत्रकामध्ये सहभागी नागरिकांनी सुचविलेली कामे याबाबतचा लेखाशिर्षानुसार गोषवारा स्वतंत्र सादर करावा. नागरिकांनी सुचविलेल्या ज्या कामांचा समावेश अंदाजपत्रकात करण्यात आलेला नाही किंवा करणे शक्य नाही. त्याबाबतच्या कारणासह माहिती लेखा विभागाकडे दोन प्रतीत पाठवावी.

८) नागरिकांचे सूचना अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख १५/१२/२०२२ अशी असून त्यानंतर मा. क्षेत्रिय समिती सभेस अंदाजपत्रक आराखडा सादर करुन त्यावर चर्चा करुन शिफारशीसह अंदाजपत्रक माहिती म.न.पा. अंदाजपत्रकात समावेश करणेसाठी दि. १५/१२/२०२२ पुर्वी वेळेचे पालन करुन सादर करावी.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी

प्रति,

१) क्षेत्रिय अधिकारी
२) क्षेत्रिय कार्यकारी अभियंता
३) स्थापत्य मुख्य कार्यालय
४) विद्युत मुख्य कार्यालय
५) पाणीपुरवठा मुख्य कार्यालय.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
# पिंपरी - ४११०१८

## :- जाहिर निवेदन :-

### पिंपरी चिंचवड महानगरपालिका सन २०२३-२०२४ चे अंदाजपत्रकात नागरिकांचा सहभाग

सर्व क्षेत्रिय समितीमध्ये सन २०२३-२०२४ चे अंदाजपत्रक तयार करताना नागरिकांनी सुचविलेली कामे विचारात घेण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार नागरिकांना त्यांच्या क्षेत्रिय कार्यालयातील/वॉर्डातील कामे सुचविण्याबाबत जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, आपल्या परिसराच्या गरजेनुसार आवश्यक व योग्य कामांचा समावेश अंदाजपत्रकात करण्यासाठी नागरिक सुचना करु शकतील.त्यासाठी विहीत नमुन्यातील "नागरिक सुचना अर्ज " प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये विनामुल्य वाटपाकरीता उपलब्ध आहेत. तसेच म.न.पा. वेबसाईट www.pcmcindia.gov.in वर उपलब्ध आहे. सदर नागरिकांचे सुचना अर्ज दि.१५/१२/२०२२ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत संबंधित क्षेत्रिय कार्यालयात तसेच खालील ई-मेलवरही स्विकारण्यात येतील. संबंधित क्षेत्रिय अधिकारी व कार्यकारी अभियंता हे सुचविलेल्या कामांची शहानिशा करुन विकास कामांचा समावेश अर्थसंकल्पात करतील. याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| A Zone | azone@pcmcindia.gov.in |
| B Zone | bzone@pcmcindia.gov.in |
| C Zone | czone@pcmcindia.gov.in |
| D Zone | dzone@pcmcindia.gov.in |
| E Zone | ezone@pcmcindia.gov.in |
| F Zone | fzone@pcmcindia.gov.in |
| G Zone | gzone@pcmcindia.gov.in |
| H Zone | hzone@pcmcindia.gov.in |
| Civil | civil@pcmcindia.gov.in |
| Electric | elecrical@pcmcindia.gov.in |
| Water | water@pcmcindia.gov.in |

**सही/-**
**( शेखर सिंह )**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी

क्र. लेखा/२९/कावि/३६२/२०२२
दि. १५/११/२०२२

# पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

## सहभागी अंदाजपत्रक नागरिक सुचना अर्ज - २०२३-२०२४

**अर्ज भरताना खालील बाबींची विशेष काळजी घ्यावी.**

१. सूचना अर्जात कामे सुचविताना जसे पूल, उड्डाणपुल, नवे रस्ते, भवन बांधकाम इ. मोठी कामे सुचवू नयेत. या उपक्रमात काम सुचविण्याची मर्यादा ही केवळ १० लाखाची आहे याची नोंद घ्यावी. वरील तक्त्यामध्ये दिलेल्या कामां व्यतिरिक्त किंवा १० लाख रूपयाच्या वरील कामे क्षेत्रीय कार्यालयामार्फत संबंधित खात्यास अग्रेषित केली जातील. सूचना अर्ज कोणत्या मुख्य खात्यास आणि कोणत्या कारणाने अग्रेषित करण्यात आला आहे याची माहिती अर्जदारास क्षेत्रीय कार्यालया मार्फत देण्यात येईल अशा अग्रेषित कामांची अंमलबजावणीसाठी संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडे पाठपुरावा करण्याची जबाबदारी संबंधित अर्जदाराची असेल.

२. सुप्रिम कोर्टाने अवैध ठरविलेली कामे करण्याबाबतच्या सूचना महानगरपालिकेला स्वीकारता येणार नाहीत.

३. नागरिक सूचना मध्ये कामाचे स्वरुप व स्थान अचूकपणे लिहावे. उदा:- औंध रावेत रस्त्यावर औंधपुल ते साई चौका पर्यंत फुटपाथ करणे.

४. नागरिकांनी सूचना अर्जातील कोष्टक १ आणि २ नुसार कामाचा सांकेतिक क्रमांक नमूद करावा.

५. नागरिकांनी सूचना अर्ज भरण्याआधी क्षेत्रीय कार्यालय / सारथी हेल्प लाईन ( 8888006666) वर संपर्क साधल्यास आपल्या सूचना अर्जा संबंधी मौलिक माहिती मिळण्यास मदत होऊ शकते.

| | |
|---|---|
| क्षेत्रीय कार्यालयाचे नाव (ज्या मध्ये काम सुचविले आहे) | |
| मतदार वार्ड नांव व नंबर(ज्या मध्ये काम सुचविले आहे) | |
| नागरिकाचे नाव | |
| संपर्काचा पत्ता | |
| **मोबाईल क्रमांक (अनिवार्य)** | |
| ई मेल ( असल्यास) | |

| अ.क्र | आपल्या परिसरातील म न पा संबंधी सुचविलेले काम व ठिकाण | या मुळे साध्य होणारा सार्वजनिक हेतू | कामाचा सांकेतिक क्रमांक |
|---|---|---|---|
| | **उदाहरण:-** अ) निगडी बस स्थानकाजवळ महिलांसाठी शौचालय बांधणे.<br>ब) मनपा .........बागे मध्ये मुलांसाठी खेळणी बसविणे | अ)महिलांना सार्वजनिक ठिकाणी सोय होईल.<br>ब)मुलांना बागेत खेळण्याचा आनंद मिळेल | १९<br>८ |
| | | | |

दिनांक :- / /२०२२ स्वाक्षरी :- ---------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंदाज पत्रक सन २०२३ - २०२४

नागरिक सुचना अर्ज पोहच पावती

| नागरिकाचे नाव | दिनांक | अनुक्रमांक |
|---|---|---|
| | | |

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी – १८

## सहभागी अंदाजपत्रक नागरिक सुचना अर्ज २०२३ – २०२४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही महाराष्ट्रातील एक पुरोगामी महापालिका आहे. महानगरपालिका हद्दीत राहणा-या नागरिकांच्या सुविधेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात नागरिकांनी सुचविलेल्या रास्त कामाचा समावेश करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

कोष्टक / तक्ता :- १

**नागरिकांना स्थापत्य,विद्युत आणि पाणी पुरवठा लेखाशिर्षा मध्ये खालील कामेसुचविता येतील (कृपया स्वतंत्र अर्ज करावा)**

| **कामाचे स्वरूप** | **सांकेतिक क्र.** | **कामाचे स्वरूप** | **सांकेतिक क्र.** | **कामाचे स्वरूप** | **सांकेतिक क्र.** |
|---|---|---|---|---|---|
| पदपथ | १ | माहिती फलक | ६ | इमारत दुरुस्ती | ११ |
| सायकल मार्ग | २ | नामफलक | ७ | सार्वजनिक वाचनालय | १२ |
| रस्ता डांबरीकरण | ३ | बैठक व्यवस्था/बाक/पार | ८ | पाणीपुरवठा | १३ |
| रस्ते दुभाजक किंवा दुरूस्ती | ४ | रस्त्यावरील दिवे | ९ | मलनि:सारण | १४ |
| बस स्थानके (बी आर टी सोडून) | ५ | वाहतुक नियंत्रक दिवे | १० | इतर | १५ |

कोष्टक :- २

**नागरिकांना लोकारोग्य या लेखाशिर्षामध्ये खालील कामे सुचविता येतील (कृपया स्वतंत्र अर्ज करावा)**

| **कामाचे स्वरूप** | **सांकेतिक क्र.** | **कामाचे स्वरूप** | **सांकेतिक क्र.** | **कामाचे स्वरूप** | **सांकेतिक क्र.** |
|---|---|---|---|---|---|
| स्मशान भूमी | १६ | कचराकुंड्या | २० | सरफेस गटर्स | २४ |
| घाट | १७ | कचराडेपो | २१ | गावठान गटर्स | २५ |
| आरोग्य निरीक्षक केबिन | १८ | कोंडवाडा | २२ | नाला ट्रेनिंग | २६ |
| संडास आणि मुता-या | १९ | कत्तलखाना | २३ | इतर | २७ |

प्रक्रिया कशी होईल :-

१. दि.१६/११/२०२२ पासून दि.१५/१२/२०२२ पर्यंत नागरिक हा अर्ज भरून कामे सुचवू शकतील.

२. नंतर शक्य कामांची पूर्व-गणनपत्रक (Estimates) तयार केली जातील.

३. त्या नंतर समाविष्ट कामांची अंतिम यादी जाहीर करण्यात येईल.

- **अनुषंगिक सूचना :**
- वरील प्रकारची कामे सुचविताना जागेचा रितसर ताबा, प्रकल्पांची निकड व आवश्यक बाबींची पुर्तता करणे शक्य असेल अशाच कामांचा समावेश अंदाजपत्रकात केला जाईल.
- मागणी केलेल्या कामांची तपशिलवार मांडणी केली जावी. उदा:- कामाचा प्रकार, कामाचा तपशिल व ठिकाण.

- अंदाजपत्रकातील कोष्टका बाहेरील असलेल्या सूचना ज्याकरीता अंदाजपत्रकामध्ये पैशाची तरतूद करणे आवश्यक नसते अशा सूचना टाळाव्यात. उदा: कर्मचा-यांची नियुक्ती किरकोळ दुरुस्त्या, स्वच्छता इ.
- सदर अर्ज सादर करण्याची अंतिम दि.१५/१२/२०२२ पर्यंत आहे. अंतिम तारखेनंतर सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
- सदर अर्ज क्षेत्रिय कार्यालये आणि www.pcmcindia.gov.in येथे उपलब्ध आहेत.
- नागरिक सूचना अर्ज हे कूठल्याही क्षेत्रीय कार्यालयासाठी सादर करू शकतात, यासाठी केवळ संबधित (म्हणजे ज्या कार्यालयाच्या अखत्यारीतील काम आहे त्याच) क्षेत्रीय कार्यालयात अर्ज सादर करावा. इतर कोणत्याही क्षेत्रीय कार्यालयात अर्ज सादर केल्यास तो निवड प्रक्रियेत ग्राह्य धरला जाणार नाही.
- आपल्या अर्जाचा जो दाखल क्रमांक असेल त्यांच्या आधारे हे काम अंदाजपत्रकात स्वीकारले गेले किंवा नाही व नसल्यास त्याबाबतची कारणे कळू शकतील.

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
## सहभागी अंदाजपत्रक नागरिक सुचना अर्ज-२०२३ –२०२४

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका ही महाराष्ट्रातील एक पुरोगामी म न पा आहे. म न पा हद्दीत राहणाऱ्या नागरिकाच्या सुविधे साठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात नागरिकांनी सुचविलेल्या रास्त कामाचा समावेश करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

कोष्टक / तक्ता : १

**नागरिकाना स्थापत्य,विद्यूत आणि पाणी पुरवठा लेखाशिर्षा मध्ये खालील कामे सुचविता येतील ( कृपया स्वतंत्र अर्ज करावा)**

| कामाचे स्वरुप | सांकेतिक क्रमांक | कामाचे स्वरुप | सांकेतिक क्रमांक | कामाचे स्वरुप | सांकेतिक क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| पदपथ | १ | माहितीफलक | ६ | इमारत दुरुस्ती | ११ |
| सायकल मार्ग | २ | नामफलक | ७ | सार्वजनिक वाचनालय | १२ |
| रस्ता डांबरीकरण | ३ | बैठक व्यवस्था /बाक / पार | ८ | पाणी पुरवठा | १३ |
| रस्ते दुभाजक किंवा दुरुस्ती | ४ | रस्त्यावरील दिवे | ९ | मलनि:सारण | १४ |
| बस स्थानके (बीआरटी बस स्थानक सोडून ) | ५ | वाहतुक नियंत्रण दिवे | १० | इतर | १५ |

**कोष्टक क्र.:** २

**नागरिकाना लोकारोग्य या लेखाशिर्षा मध्ये खालील कामे सुचविता येतील ( कृपया स्वतंत्र अर्ज करावा)**

| कामाचे स्वरुप | सांकेतिक क्रमांक | कामाचे स्वरुप | सांकेतिक क्रमांक | कामाचे स्वरुप | सांकेतिक क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| स्मशान भूमी | १६ | कचराकुंडया | २० | सरफेस गटर्स | २४ |
| घाट | १७ | कचराडेपो | २१ | गावठाण गटर्स | २५ |
| आरोग्य निरीक्षक केबिन | १८ | कोंडवाडा | २२ | नाला ट्रेनिंग | २६ |
| संडास आणि मुता-या | १९ | कत्तलखाना | २३ | इतर | २७ |

**प्रक्रिया कशी होईल -**

१. **दि. १६/११/२०२२ पासून दि. १५/१२/२०२२** पर्यंत नागरिकांनी हा अर्ज भरून कामे सुचवू शकतील.

२. नंतर शक्य कामांची पूर्व-गणनपत्रक (Estimates) तयार केली जातील.

३. त्या नंतर समाविष्ट कामांची अंतिम यादी जाहीर करण्यात येईल.

**अनुषंगिक सूचना:**

१. **कुपया एका कामा साठी एकच अर्ज भरावा. एक व्यक्ती अधिक अर्ज भरू शकते.**

२. वरील प्रकारची कामे निवडताना प्रस्तावित कामाच्या जागेचा रितसर ताबा, खर्च इ. आवश्यक बाबींची पूर्तता करूनच कामांचा समावेश अंदाजपत्रकात केला जाईल.

३. अंदाजपत्रकातील कोष्टका बाहेरील सूचना ज्याकरीता अंदाजपत्रका मध्ये पैशाची तरतूद करणे आवश्यक नसते, अशा सूचना टाळाव्यात. उदा: कर्मचा-यांची नियुक्ती किरकोळ दुरुस्त्या, स्वच्छता इ.

४. सदर अर्ज सादर करण्याची दि.१५/१२/२०२२ पर्यंत आहे. अंतिम तारखेनंतर सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

५. सदर अर्ज क्षेत्रीय कार्यालये आणि www.pcmcindia.gov.in येथे उपलब्ध आहेत.

६. नागरिक सूचना अर्ज हे कुठल्याही क्षेत्रीय कार्यालयासाठी सादर करू शकतात, यासाठी केवळ संबधित (म्हणजे ज्या कार्यालयाच्या अखत्यारीतील काम आहे त्याच) क्षेत्रीय कार्यालयात अर्ज सादर करावा. इतर कोणत्याही क्षेत्रीय कार्यालयात अर्ज सादर केल्यास तो निवड प्रक्रियेत ग्राह्य धरला जाणार नाही.

७. आपल्या अर्जाचा जो दाखल क्रमांक असेल त्यांच्या आधारे हे काम अंदाजपत्रकात स्वीकारले गेले किंवा नाही व नसल्यास त्याबाबतची कारणे कळू शकतील.